Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-II FEBRUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# भगतसिंग आणि आजचा युवक

प्रा.डॉ.संग्राम गोपीनाथ थोरात
सहाय्यक प्राध्यापक
मराठी विभाग किसन वीर महाविद्यालय, वाई.

'' भगतसिंग आणि आजचा युवक''.

शूर आम्ही सरदार आम्हाला, काय कुणाची भिती
देव देश अन् धर्मापायी, प्राण घेतलं हाती !

असे जुन्या मराठी चित्रपटामध्ये एक गीत आहे. पण देव, देश आणि धर्म यांची सांगड कशी घालायची? हा मोठा प्रश्न आहे. भारतीय जनता वेगवेगळया धर्मांमध्ये विखूरलेली आहे. प्रत्येकजण माझाच धर्म श्रेष्ठ या मतावर ठाम आहे. मग नक्की कोणता आणि कोणाचा धर्म सर्वश्रेष्ठ? सुमारे ५४ टक्के तरूण असणारी भारतीय जनता या प्रश्नाकडे कसे पाहते? की धर्माच्या नावावर हिंसाचार माजवण्यात दंग आहे? प्रश्न आणि प्रश्न! असे अनेक प्रश्न आऽऽऽ वासून आपल्यासमोर उभे आहेत. त्यांची उकल कशी व कुणी करायची? कारण नेते फक्त 'व्होट' चा, उद्योजक फक्त 'नोट' चा व सर्वसामान्य जनता फक्त 'पोटा' चा विचार करताहेत. मग हे प्रश्न सुटणार कसे? आमच्या इतिहासातील शूर सरदारांच्या ठीकाणी असणारी तेजस्विता, तपस्विता, तत्परता गेली कुठे? धैर्याने कोंडाणा घेणारा तानाजी, शर्थीने घोडखिंड लढविणारा बाजीप्रभू, 'बचेंगे तो औरभी लडेंगे' म्हणणारा दत्ताजी, 'मेरी झॉंशी नही दुंगी' म्हणणारी राणी लक्ष्मीबाई, 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' असे इंग्रजांना ठणकावणारे लोकमान्य यांच्या ठीकाणी असणारे धैर्य, चिकाटी, सचोटी गेली कुठे? हे सर्व पाहिल्यावर आजच्या पिढीला म्हणावेसे वाटते —

कोण होतास तू, काय झालास तू?
अरे वेड्या कसा वाया गेलास तू !

खरचं सगळं विस्कटल्यासारखं झालय. देशाला स्वातंत्र्याचा सूर्य दाखवणाऱ्या क्रांतिकारकांनी हे दिवस पाहण्यासाठी अट्टाहास केला होता का? तात्या टोपे, मंगल पांडे, चंद्रशेखर आझाद, वासुदेव बळवंत फडके, बाबू गेनू, मदनलाल धिंग्रा, शिरिषकुमार मेहता, स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, पंडित नेहरू, महात्मा गांधी यांनी नक्की कोणत्या भारताचं स्वप्न पाहिलं होतं? संविधानातील 'आम्ही, भारताचे लोक,भारताचे एक सार्वभौम' किंवा प्रतिज्ञेतील 'भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत' असे म्हणताना भारतीय नागरिक म्हणून आम्ही किती दक्ष असतो? आपण या भूमिशी किती प्रामाणिक राहतो? ज्येष्ठ विचारवंत संदीप वासलेकर एका दिशेचा शोध या पुस्तकात परदेशातील अनुभव सांगताना म्हणतात एकदा मी रस्त्यात एक गोड पदार्थ खाऊन वरचा कागद तसाच टाकला. माझी चूक झाली होती हे कळले; पण कंटाळा आल्याने मी तसाच पुढे गेलो. थोड्या वेळाने एक वृध्द गृहस्थ धावत माझ्याकडे आले. मला नम्रपणे म्हणाले,''तुम्ही आमच्या देशात पाहुणे दिसता, म्हणून रागावत नाही. आम्हाला रस्त्यावर कचरा टाकलेला आवडत नाही. मी तुमच्या कचऱ्याचा कागद माझ्या खिशात उचलून ठेवला आहे. तो मी पुढील पेटीत टाकेन. पण तुम्ही अशी चूक पुन्हा करू नका''(पृ.क्र.१४२) परदेशातील लोक स्वच्छतेबाबत एवढे जागृत दिसतात मग आपण आपल्या भूमीशी असे अप्रामाणिक का? कुठं गेलं आपलं राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्राभिमान. का हे जागृत होण्यासाठी एखाद्या सैनिकाला शहिद व्हावे

लागेल; की भारतीय क्रिकेट संघाने एखादा सामना जिंकावा लागतो; की देशप्रेम उफाळून येण्यासाठी पाकिस्तानच्या हल्ल्याची आपण वाट पाहतो आहोत? वयाच्या अवघ्या पंचवीसाव्या वर्षी उपोषण करुन तुरुंगातच प्राण सोडणारा बंगाली क्रांतिकारक कुठे आणि आजची हॉटस् ॲप व फेसबुक मध्ये अडकलेली तरुणाई कुठे? भारतीय स्वातंत्र्यासाठी स्व—प्राणांची आहुती देणारे भगतसिंग, सुखदेव, राजगुरू कुठे व आजचा आत्मकेंद्रित समाज कुठे? भगतसिंगांना क्रांतिकार्यात मदत करणाऱ्या दुर्गाभाभींना भेटायला गेलेल्या 'सरदार भगतसिंग' या पुस्तकाचे लेखक संजय नहार यांना आलेला अनुभव वयाची नव्वदी गाठलेल्या दुर्गाभाभी म्हणतात, 'काय सांगावे, आजही अनेक आठवणी ताज्या आहेत. मात्र क्रांतिकारकांनी पाहिलेल्या स्वप्नाचे काय झाले? ते अपूर्णच राहिले ना? आज कुठेही देशभक्तीचा जोश नाही. सर्वत्र स्वार्थ आहे, सर्व पक्षांमध्ये, नेत्यांमध्ये पैसे कमविण्याची चढाओढ सुरू आहे. भ्रष्टाचाराने देशाला पोखरले आहे. आम्ही ज्या भारताचे स्वप्न पाहिले तो हा भारत नाही.'(पृ.क्र.७४) मलातर असे वाटते की, भगतसिंगांनी आणि ध्येयवेड्या क्रांतिकारकांनी भारत हा देव व स्वातंत्र्य हे धर्म मानून आयुष्यभर वाटचाल केली असावी. मैं नास्तिक हूं। असे जरी भगतसिंगांनी म्हंटले असले तरी त्यांची देशावर भक्ती होती, स्वातंत्र्यावर श्रध्दा व कर्तृत्वावर निष्ठा होती म्हणूनच ते न—डगमगता इंग्रजांना सामोरे गेले.

सरदार किसनसिंह व विद्यावती या दाम्पत्याच्या पोटी जन्मलेले भगतसिंग बालपणाचासूनच बाणेदार वृत्तीचे होते. 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' या म्हणीचे प्रत्यंतर त्यांच्या बालपणातून घडते. कर्तृत्ववान पुरुषाच्या जन्मावेळी शुभ घटना घडतात असे म्हंटले जाते. भगतसिंगांच्या जन्मावेळी त्यांचे वडील व दोन चुलते यांची तुरुंगातून सुटका झाली म्हणून त्यांना 'भागोवाला' (भाग्यवान) आहे म्हणून 'भगतसिंग' असे नाव त्यांची आजी जय कौर यांनी ठेवले. त्यांचे पूर्ण जीवनकार्य पाहिल्यावर ते आपल्या देशासाठीही किती भाग्यवान होते हेच समजते. ते अडीच तीन वर्षांचे असताना शिवारात आंब्याची रोपं लावण्याचं काम सुरू होतं. चिमुकला भगतही रोपं लावू लागला. वडिलांनी त्याला कौतुकाने विचारले 'काय रे भगत, काय करतोयस?' तेव्हा बाल भगतचे उत्तर होते. 'बंदुका पेरतो आहे'(पृ.क्र.३३) असे रानात बंदुका पेरणाऱ्या भगतने पुढे भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटवली. अशा बाणेदार उत्तरांनी ते सर्वांना आपलेसें करीत. त्यांच्या संपर्कात आलेला प्रत्येकजण त्यांचा मित्र बनत असे. एका शिंप्याने त्यांचा शर्ट शिवून दिला. घरी त्यांना विचारले हा शिंपी कोण? छोटा भगत म्हणतो 'शिंपी माझा मित्र आहे.' त्यांना विचारण्यात आले हा माझा मित्र तो माझा मित्र असे कसे रे भगत. 'हो! हो! सगळा गाव माझा मित्र आहे.'(पृ. क्र.३४) असे भगतचे उत्तर होते. बालपणीचं त्यांचं प्रत्येक उत्तर असं मार्मिक आणि बाणेदार असे. आपल्या मित्रांशी बोलतानाही ते असेच उत्साहपूर्ण बोलत असत. प्राथमिक शाळेत शिकत असताना 'तुम्ही मोठेपणी काय करणार?' असा प्रश्न मित्रांना विचारी प्रत्येकजण आपापल्या मनातील इच्छा बोलून दाखवित असत. काही जणांचं उत्तर असायचं मी लग्न करणार हे उत्तर ऐकताच भगतसिंग जोशात म्हणे, 'हं....लग्न करणे म्हणजे मोठे काम आहे का? मी कधीच लग्न करणार नाही. मी इंग्रजांना देशाबाहेर हाकलणार आहे.'(पृ.क्र.३५) अशी ध्येयासक्ती असणारा माणूसच मोठे काम करू शकतो. यात तीळमात्रही शंका नाही. चौथी—पाचवीत शिकणाऱ्या एका बालकाचे असे विचार असतील त्या देशाला कोण संपवू शकेल? बरं तो वर्गातही हुशार होता. त्याला वाचनाचीही आवड होती. त्याच्या क्लासच्या शिक्षकांना भगतच्या वडिलांनी विचारलेल्या 'काय म्हणतोय तुमचा शिष्य' या प्रश्नावर शिक्षक म्हणतात. ' शिष्य? अहो तो माझाा गुरू आहे! त्याला काय शिकवायचे? तो तर आधीच सर्व शिकलेला आहे'(पृ.क्र.३५) दुसरा एक मन हेलावून टाकणारा प्रसंग आहे. त्यावेळी भगतचे वय होते १२ वर्षे; साल होते १९१९ चे; त्या वर्षी १३

एप्रिलला अमृतसर मध्ये देशातील सर्वात भीषण जालियनवाला बाग हत्याकांड झाले. ही बातमी बाल भगतला समजताच दुसऱ्या दिवशी ते घरातून शाळेत जाण्यासाठी निघाले. आणि सरळ अमृतसरला जाऊन पोहोचले. त्यांनी जालियनवाला बागेतील निरपराध्यांच्या रक्ताने माखलेली माती उचलली, स्वत:च्या कपाळाला लावली आणि थोडी माती एका छोट्या बाटलीत भरून परतले. ते खूप उदास आणि क्षुब्ध झाले होते. घरातील छोट्या बहिणीने उशिरा येण्याचे कारण विचारले त्यावेळी बहिणीला त्यांनी ती बाटली दाखवली आणि म्हणाले, 'या इंग्रजांनी आपली शेकडो माणसे ठार मारलीत.' एवढं बोलून झाल्यावर भगतसिंगने बाहेरुन फुले आणली आणि त्या बाटलीच्या भोवती ठेवली. पुढेही अनेक दिवस त्या मातीला नमन करुन फुले वाहणे सुरू होते.(पृ. क्र.३६—३७) हे नमन बलीदानास होते. भगतसिंग असे हळूहळू घडत होते. येथे मला याच प्रसंगाशी संबंधीत असणाऱ्या क्रांतिवीर उधमसिंह यांची प्रकर्षाने आठवण होते आहे कारण ते स्वत: जालियनवाला बागेत हजर होते. त्याच ठिकाणी याला जबाबदार असणाऱ्या रेझीनोल्ड डायर व मायकेल वोडवायर या इंग्रज अधिकाऱ्यांची हत्या करण्याचा त्यांनी निश्चय केला. ते दोघेही लंडनला गेल्याने त्यांच्या मागावर उधमसिंग लंडनला गेले. दरम्यान डायरचा मृत्यू झाला. लंडनमधील एका कार्यक्रमास वोडवायर येणार असल्याची बातमी त्यांना कळाली जालियनवाला बाग हत्याकांडाच्या २१ वर्षानंतर ३ मार्च १९४० ला उधमसिंगांनी त्या अधमाला उडवले आणि हात जोडून हत्याकांडातील जनतेला अभिवादन केले. असे देशप्रेम आजच्या पिढीत दिसते का? हा माझा सवाल आहे. मलाही २०१४ मध्ये उजळणी वर्गासाठी पतियाळा येथे तीन आठवडे राहण्याचा योग आला त्यावेळी जालियनवाला बाग पहायला गेल्यावर अक्षरश: माझ्या डोळ्यात पाणी आले. ही संवेदनशीलता कुठेतरी हरवत निघाली आहे याचीच खंत वाटते असो. पुढे भगतसिंग १९२१ साली नववीत असताना त्यांनी शाळा सोडून स्वातंत्र्यआंदोलनात उडी घेण्याचा दृढ निश्चय केला. ते आंदोलनात सक्रिय सहभागीही झाले पण त्यांच्या कडील ज्ञान आणि चैतन्य बघून भाई परमानंदांनी त्यांना पुन्हा नॅशनल कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायला प्रवृत्त केले. त्या कॉलेजचे अभ्यासू व कष्टाळू विद्यार्थी म्हणून भगतसिंगकडे पाहिले जात होते. कॉलेजमध्ये नॅशनल नाटक क्लबच्या वतीने राष्ट्रीय भावना जागृत करणाऱ्या नाटकांची निर्मिती करण्यात आली त्यावेळी भगतसिंगने राणाप्रताप, भारतदुर्दशा आणि सम्राट चित्रगुप्त या नाटकांत अत्यंत प्रभावी भूमिका केल्या. पुढे १९२९ मध्ये दिल्ली जेलमधून आपल्या वडिलांना लिहिलेल्या पत्रात लिहितात, 'जमलेतर टिळकांचे गीतारहस्य, नेपोलियनचे जीवनचरित्र व काही इंग्रजी पुस्तके घेऊन येणे.(पृ.क्र.८३) अशाप्रकारे भगतसिंग नेतेतर होतेच शिवाय अभिनेते आणि प्रणेतेही होते. अशा हरहुन्नरी नातवाच्या लग्नाचा घाट त्यांची दादी यश कौर यांनी घातला. घरात लग्नाची लगबग सुरू झाली पाहुण्यांना भगतसिंग पसंतही पडले. साखरपुडयाचा दिवस ठरला पण ते समजताच त्यांनी आपल्या वडिलांना पत्र लिहून लग्नाला नकार दिला व घर सोडून ते पूर्णवेळ क्रांतिकारक म्हणून सक्रिय झाले. ते कानपूरला जाऊन योगेशचंद्र चटर्जीबरोबर काम करू लागले. तेथील 'प्रताप' दैनिकाच्या संपादन विभागात पत्रकार म्हणून बलवंतसिंह असे नाव बदलून कामास राहिले. यासोबतच त्यांना गणेश शंकर विद्यार्थी यांनी अलीगड मधल्या खैर तालुक्यातील शादीपूर गावी नॅशनल स्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी दिली. इकडे भगतसिंगांच्या जाण्याने दादी जय कौर आजारी पडल्या. किशनसिंहांनी 'वंदे मातरम्' वृत्तपत्रात आजी आजारी असल्याची जाहिरात दिली. दादीच्या प्रेमामुळे भगतसिंगला पुन्हा गावी यावे लागले. आजीची सेवा करीत करीत त्याने चळवळीचेही काम चालू ठेवले. आंदोलनाविषयीची त्यांची कल्पना स्पष्ट होती भगतसिंग म्हणतात, 'आता या देशात एक नवे आंदोलन सुरू झाले आहे, ज्याची पूर्वसूचना आम्ही दिली आहे. हे आंदोलन गुरू गोविंदसिंह आणि

छत्रपती शिवाजी महाराज, कमालपाशा आणि रिझाखॉ, वॉशिंग्टन आणि गैरिबाल्डी, तसेच लाफायेत, लेनिनच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन सुरू झाले आहे.'(पृ.क्र.८७—८८) नौजवान भारत सभेचे ते अध्यक्ष झाले. भगतसिंगांच्या रक्तातच क्रांतीचा विचार भिनला होता. क्रांती विषयी भगतसिंग म्हणतात,'क्रांतीची आमची व्याख्या अशी आहे, की अन्यायावर आधारित सध्याच्या व्यवस्थेत बदल करणे. उत्पादक अथवा कष्टकरी लोक या समाजाच्या अत्यंत आवश्यक बाजू आहेत. परंतु शोषक लोक त्यांना श्रमाचा मोबदला आणि इतर बहुमूल्य अधिकारांपासून वंचित ठेवतात. एकीकडे सर्वांसाठी अन्न उगवणारे शेतकरी कुटुंबासह उपाशी मरत आहेत, जगाच्या बाजारातील कपड्यांची गरज भागविणारे वीणकर आपल्या स्वत:च्या आणि मुलाबाळांच्या उघड्या शरीराला झाकण्यासाठी मात्र कपडे मिळवू शकत नाही.'(पृ.क्र.८८) धर्म पंथ, जात पात यांच्या पलीकडे जाऊन त्यांनी देश व देशबांधव यांचाच विचार केला. हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र संघाचे नेतृत्व करतानाही स्वत:च्या शिख धर्माचा विचार न करता धर्मात केसांना अनन्यसाधारण महत्त्व असतानाही भगतसिंगांनी आपली शिखी राष्ट्रासाठी अर्पण केली. त्यामुळे त्यांना नवीन नाव मिळाले 'रणजित' प्रत्येक घटना त्यांना अस्वस्थ करित होती. देशात होणाऱ्या हिंदू मुस्लिम दंगली संवेदनशील मनाला अस्वस्थ करित होत्या. त्यांची भूमिकाच धार्मिक विभागणीच्या विरोधात होती. लाला लजपतरायांशी खटके उडत असत. पण पुढे भगतसिंगांना जी फाशी झाली ती लालाजींच्या हत्येसाठी जबाबदार असलेल्या स्कॉट या पोलिस अधिकाऱ्याच्या हत्तेसाठी. भगतसिंगांनी धार्मिक दंगलींसंदर्भात १९२८ मध्ये लिहिलेला 'धार्मिक दंगली आणि त्यावरील उपाय' हा लेख आजच्या २१व्या शतकातील सध्याच्या परिस्थितीतही लागू होतो. या धर्मांध दंगली भारताची पाठ कधी सोडतील? थंड डोक्याने विचार करणारा हिंदू, मुसलमान अथवा शिख आज अपवादानेच दिसतो, दंगलींच्या पाठीमागे धर्मांध नेते आणि वृत्तपत्रे यांचा हात आहे. हे त्यांचे ९० वर्षांपूर्वीचे विचार डोळ्यात झाणझणीत अंजन घालतात. सदर लेखातील त्यांच्या विचारांवर चिंतन करून मार्ग काढला असता तरी पुढील समस्या टळल्या असत्या असे मला वाटते.

अशाप्रकारे भगतसिंग आयुष्यभर विचारांनी लढाई लढत राहिले. २३ मार्च १९३१चा दिवस उजाडला त्यावेळी भगतसिंगांचे वय होते २३ वर्षे ५ महिने २६ दिवस. खरतर दुसऱ्या दिवशी त्यांना फासावर चढवले जाणार होते. तरिही भगतसिंगांचा चेहरा निर्विकार होता. ते शांतपणे 'ट्रिब्युन' हे वृत्तपत्र वाचत होते. त्या वर्तमानपत्रात रशियात समाजवादी समाजरचनेचा पाया घालणाऱ्या लेनिनवर टीकात्मक लेख होता. भारतात समाजवादी समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहणारे व लेनिनला आदर्श मानणारे भगतसिंग अस्वस्थ झाले. खरतर काळकोठडीच्या बाहेर मृत्यू वाट पहात असताना ते खिन्न दिसायला हवे होते, ते आपल्या प्रिय व्यक्तींच्या आठवणींत मग्न असायला हवे होते. पण यापैकी काहीच झाले नाही त्यांनी वकिल प्राणनाथ मेहतांना एक गुप्त पत्र पाठविले व मृत्यूपत्राचे कारण सांगून भेटायला येताना लेनिनचे जीवनचरित्र आणायला सांगितले. असा जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांनी देशाचा आणि फक्त देशाचाच विचार केला. तुरुंगात त्यांनी वाचनावर भर होता चार्ल्स डिकन्स त्यांचा प्रिय लेखक होता.रिड्सचे 'टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड', रोपशिनने लिहिलेले 'रशियन डेमोक्रशी' आणि मैक्स्विनीने लिहिलेले 'प्रिन्सिपल्स ऑफ फ्रीडम' ही पुस्तके त्यांनी याच काळात वाचली (पृ.क्र.१३४) तसेच आत्मकथा, द डोअर टू डेथ, आयडियल ऑफ सोशॅलिझम आणि स्वातंत्र्याच्या लढाईमधील पंजाबचा पहीला उठाव (पृ.क्र.१३५) अशी चार पुस्तकेही लिहिली. लाहोरच्या तुरुंगात भगतसिंगांची अशी दिनचर्या चालू असताना २४ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना फाशी देण्याचे न्यायालयाने फर्मान काढले. त्यांना भेटायला येणाऱ्यांच्या चेहऱ्यावर काळजी दिसायची मेहतांनी भगतसिंगला शेवटची इच्छा विचारली

तेव्हा हा देशभक्त म्हणतो,'पुन्हा याच मातीत जन्म घेऊन मातृभूमीची अधिकाधीक सेवा करण्याची संधी मिळावी.'(पृ.क्र.१४८) मेहता म्हणतात त्यांना पाहून मला ते मानव नाहीत देव असावेत असे वाटत होते. तर दुसरे वकिल बलजितसिंह म्हणतात, त्या भेटीत भगतसिंगांनी माझ्या कर्तव्याची जाणीव करून देताना मला सांगितले,'फाशी तर आमच्या कृत्याचा नैसर्गिक परिणाम आहे. मी प्रसन्न आहे शांत आहे.'(पृ.क्र.१४९) तर तुरुंगातील एक क्रांतिकारक त्यांना अजूनही सोडवणे शक्य आहे. फक्त तुम्ही मान्यता द्या असे चिठ्ठीत लिहितो त्याला उत्तरादाखल भगतसिंग लिहितात,'देश आणि मानवतेसाठी जे काही करण्याची स्वप्ने मनात होती, त्याचा हजारावा भागही मी पूर्ण करू शकलो नाही. जर जिवंत राहू शकलो असतो तर कदाचित ही सारी स्वप्ने मी पूर्ण करू शकलो असतो......आता माझी काहीही इच्छा शिल्लक राहिलेली नाही.'(पृ.क्र.१५०) यातून त्यांची जाज्वल्य देशभक्ती व मृत्यूची आसक्ती दिसून येते. फाशीचा दिवस २४ मार्च होता पण आदल्या दिवशीच दुपारी सूचना आली की, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना आज सायंकाळीच फाशी दिली जाणार आहे. फाशीच्या आदेशानुसार त्यांना तयार होण्यास सांगितले तेव्हा भगतसिंगांच्या डाव्या हातात लेनिनचे चरित्र होते. पुस्तकावरून नजर न हलवता उजवा हात तुरुंगाधिकाऱ्याच्या दिशेने वर करून भगतसिंग म्हणाले, 'थांबा, एक क्रांतिकारक दुसऱ्या क्रांतिकारकाला भेटत आहे.'(पृ.क्र.१५३) फाशी जाण्यापूर्वी शेवटचे स्नान करताना भगतसिंग गुणगुणत होते,'मेरा रंग दे बसंती चोला..., दम निकले इस देश की खातिर बस इतना अरमान है। (पृ.क्र.१५३)' फाशीच्या दोरखंडाकडे जाताना भगतसिंग मधे सुखदेव त्यांच्या डावीकडे आणि राजगुरू उजवीकडे होते. तिघांनी हातात हात गुंफले होते. भगतसिंगांनी एकदम गायला सुरुवात केली.

दिलसे निकलेगी न मरकर भी वतन की उल्फत
मेरी मिट्टी से भी खूशबू–ए–वतन आएगी।

अशाप्रकारे भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांचा अंत झाला. ही बातमी सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली लोक संतप्त झाले. पेटत्या मशाली घेऊन तुरुंगाकडे येणाऱ्या लोकांना पाहून इंग्रज घाबरले भ्याड इंग्रजांनी तिघांच्या देहाचे तुकडे करून पोत्यात भरून सतलज नदीकाठी पेटवून दिले हजारो लोकांचा जथ्था येताना पाहून अर्धवट जळालेले देह नदीत टाकून पळ काढला. भगतसिंगच्या मृत्यूच्या बातमीने माता विद्यावती खचल्या पण रडल्या नाहीत कारण त्यांच्या लाडक्या भगतने सांगितले होते,'बेबेजी, रोना मत। ऐसा न हो आप पागलों की तरह रोती फिरें। लोग क्या कहेंगे, कि भगतसिंग की माँ रो रही है।'(पृ.क्र.१५७) त्या रात्री त्या माऊलीची काय अवस्था झाली असेल?

जिस दिन तेरे गले में फांशीका फंदा पडा,
उस दिन तेरी माँ कैसे सोयी होगी।
अरे ओ भगतसिंग तेरे गलेमे पडनेसे पहले,
ओ रस्सी भी सौं बार रोई होगी।।

'अब तुम्हारे हवाले वतन साथियों' या भावनेतून या त्रिमूर्तीनी देश आपल्या हवाली केला. त्यांनी त्यांचे कामतर १०० टक्के केले पण आपण मात्र करंटे निघालो. संजय नहार म्हणतात,'ज्या उदात्त हेतूने क्रांतिकारकांनी आपल्या सर्वस्वाचे बलिदान केले, त्यांच्या स्वप्नांचा असा चक्काचूर होताना पाहणे याची आम्हा तरुण पिढीला लाज वाटायला हवी. मात्र आता तर तीही वाटेनाशी झाली आहे. १५ऑगस्ट, २६जानेवारी, २३मार्चला शहिदांची आठवण काढली जाते मात्र केवळ दिखाऊ'(पृ.क्र.११३) आपण आपसातच भांडत बसलोय. आपण ज्या शेजारी राष्ट्राला शत्रू समजतो

तो पाकिस्तानही भगतसिंगला आपले मानतो. या तिघांना जिथे फाशी दिली तिथे आता जेल नाही. त्या शादमान चौकाला ‘ भगतसिंग चौक’ असे नाव द्यावे यासाठी मोठी चळवळ पाकिस्तानात सुरू झाली आहे. २३ मार्चला शेकडो लोक जमतात ‘ भगतसिंग जिंदाबाद, भगतसिंग अमर रहे’ अशा घोषणा देतात. हे भगतसिंगच्या आहुतीचे यश आहे. पण आपल्या देशातील तरूण निष्क्रिय दिसताहेत. जात—पात, धर्म—पंथ यांच्या पलिकडे जाऊन ते विशाल दृष्टीकोनातून पाहतात का? याचं उत्तर होय असे जर असेल तरच आपला भारत देश सर्वच क्षेत्रांमध्ये महासत्ता बनेल. शेवट डॉ. शिवराम माळी लिखित ‘वेळ हीच: भगतसिंगाला आठवण्याची’या पुस्तकातील परिच्छेदाने करतो,‘आज भारतात गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. सैध्दांतिक संघर्ष लुप्त होऊ पाहत आहे.संगणक,मुक्त आर्थिक नीती,चंगळवाद,गुंडगिरी यामुळे गरीब अधिक गरीब होत चालला आहे.. .अद्याप भाषा व लिपीबाबत एकवाक्यता नाही.‘कॉमन मॅन’दुर्लक्षिला जात आहे; म्हणून हीच वेळ आहे—भगतसिंगला आठवण्याची.’(पृ.क्र.३०)

## संदर्भ सूची

१. वासलेकर संदीप :‘एका दिशेचा शोध’ चौथी आवृत्ती, राजहंस प्रकाशन,पुणे, २०११.
२. नहार संजय:‘सरदार भगतसिंग’,पाचवी आवृत्ती, चिनार पब्लिशर्स, पुणे २०१६.
३. डॉ. माळी शिवराम :‘वेळ हीच: भगतसिंगाला आठवण्याची’प्रथम आवृत्ती, मानस प्रकाशन, कोल्हापूर,१९९९.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com